**Certificate in Language Examination, 2019**
**Marathi**
**Paper - I**

**Time : 3 Hours** **Full Marks : 80**

Questions are of value as indicated in the margin

अ) व्याकरण

१. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा . 05

१. यथाशक्ती
२. बरेवाईट
३. कंबरपट्टा
४. क्रीडांगण
५. अहिंसा

२) खालील शब्दांची संधी करा. 05

१. सूर्य + अस्त
२. सत् + जन
३. जगत्+नाथ
४. यश: + धन
५. चंद्र + उदय

३) खालील अशुद्ध शब्दांची शुद्ध रूपे लिहा. 05

१. कवीराज
२. कप्लना
३. आशिर्वाद
४. तीसरा
५. नाविव्य

४) विभक्ती म्हणजे काय ते सांगून विभक्तीचे प्रकार व प्रत्यय लिहा. 05

P.T.O.

ब) म्हणी-वाक्प्रचार

१) खालील म्हणींचा अर्थ विशद करा . 05

१. आंधळे दळते कुत्रे पीठ खाते .
२.अडला नारायण गाढवाचे पाय धरी .
३.असतील शिते तर जमतील भुते .
४.नकटीच्या लग्नाला सतराशे साठ विघ्ने .
५.मिळाले तर तुपाशी नाही तर उपाशी .

२) खाली दिलेल्या परिच्छेदात योग्य विराम चिन्हांचा वापर करा . 05

रामभाऊंना अखेर मनासारखे घर मिळाले आहे स्वस्त आणि मस्त ! भाडं कमी पण सगळ्या सुखसोई आहेत . ते लवकरच त्या घरात जातील . कालच त्यांनी मला सांगितले गोविंदरावांना घेवून या घरी मी आणि आमची ही दर रविवारी जाणार असू . तुम्हीही याल का आपण एकदम जाऊ या . काय म्हणता वहिनींना जमणार नाही ठीक आहे तुम्ही नंतर जा मी उद्या एखादी चक्कर टाकीन त्यांना काही मदत लागणार असेल तर पाहीन . कदाचित ही देखील बरोबर असेल . नाहीतर ती आणि वहिनी नंतर जातील . जमेल तसे करू . त्यांना मदत करूया त्यांच्या आनंदात सामील होऊया . आजकाल एकवेळ मनासारखा जावई मिळेल मनासारखी सून मिळेल पण भाड्यानं आशाच सोडा . तशात रामभाऊंना हे घर मिळले मग रामभाऊंचा आनंद काय सांगू त्यांना स्वर्ग दिन बोटं उरला आहे .

क) भाषांतर

१) खाली दिलेल्या इंग्रजी परिच्छेदाचे मराठी भाषांतर करा . 10

Have a glance at the life of afarmer. Let hunger strike their children, the wife of the farmer, keeping stone on her heart, preserves the leftover grains for sowing. You may say, "How mad she is!" She is laying the precious grains into the soil, instead of feeding her children. But she knows that those grains are going to multiply in thousands. This is the process of rising again. Our youth should have daring spirit and patience like her. The chariot of society runs on the two wheels of constructive work

and battle against evils. Whatever may be the colour of the flag on your chariot- red, blue , green or saffron . It runs on these wheels only. Without integration of wisdom and work , nothing happens. In china, Mao united wisdom and work strongly. His programmes were long enongh and lond enough.

२) खाली दिलेल्या हिंदी परिच्छेदाचे मराठी भाषांतर करा . 10

मेरा गाँव पूर्णत: निरीक्षर था। गाँव में कोई स्कूल भी नहीं था। बच्चे पडोस के गाँव के स्कूल में पढ़ते थे। छुट्टियों में मैं प्रौढ़ो को साक्षर बनाने के अभियान में जुट गया । मैने पहले अपने ही घरके लोगों को पढ़ाने लिखाने का निश्चय किया । वे तैयार भी हो गए । लेकीन दादा दादी तैयार नहीं हुए । मैने उन्हें समझाने का काफी प्रयास किया आखिर वे तैयार हुए। अपने काम में मुझे सफलता मिली । इसी प्रकार साक्षरता का प्रचार कार्य मैं ने घर से ही शुरू किया । आज मेरे घर के सभी लोग पढने लिखने लगे हैं , इस बात की मुझे ख़ुशी हैं । विशेषकर दादी को पढाना मेरे लिए मुश्कील रहा लेकीन मैने बहुत प्रयास के बाद दादी को पढना लिखना शीखाया । आप भी अपने घर में यह प्रयोग कर सकते हैं ।

ड) निबंध लेखन व पत्रलेखन

१) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा . 10

अ.माझा आवडता खेळ

ब. माझा आवडता समाजसुधारक

क. माझी शाळा

२) प्रकाशकाला पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा. 10

किंवा

आपण राहत असलेल्या भागातील स्वच्छतेसाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहा.

इ) सारांश लेखन .

१) खालील परिच्छेदाचा सारांश लिहा . 05

ही सुमारे दीडशे वर्षापूर्वीची गोष्ट आहे . पुण्यातल्या बुधवार पेठेतल्या भिडेवाड्याकडे एक तरूण स्त्री लगबगीने निघाली होती . रस्त्यावर काही लोक त्या स्त्रीची वाट पाहताच उभे होते. तिला पाहून ते लोक फिदीफिदी हसू लागले. गर्दीतून कोणीतरी तिच्याकडे शेणगोळे व दगडगोटे भिरकावले. पण ती तरुण स्त्री मोठी धीराची न घाबरता शांतपणे ती म्हणाली , "तुम्ही मला कितीही त्रास द्या पण हाती घेतलेलं चांगल काम मी मुळीच सोडणार नाही ." कोण बरे होती ही तरुण स्त्री ? कोणते चांगले काम तिने हाती घेतले होते ? ती स्त्री म्हणजे पहिली भारतीय शिक्षिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले. त्या काळात स्त्रियांना शिकायला मनाई होती. मुलींना कशासाठी शिकवायचं ?काय करणार मुली शिकून ? असे लोक म्हणत. अशा प्रतिकूल काळात मुलींना शिकविण्यासाठी सावित्रीबाई घराबाहेर पडल्या .त्या काळातील लोकांना हे सहन झाले नाही . त्यांनी सावित्रीबाईंना त्रास द्यायला सुरुवात केली .

२) खालील पद्य रचनेचे सारग्रहण करा . 05

विद्ये विना मती गेली । मती विना निती गेली॥
निती विना गती गेली । गती विना वित्त गेले।।
वित्त विना शुद्र खचले । एवढे अनर्थ एका अविद्येने केले॥

- महात्मा फुले